Suptbeej Foundation Capacity Development

# SUPTBEEJ FOUNDATION

### सुप्तबीज फाउंडेशन आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त

# सन्मान आईच्या कर्तुत्वाचा




दिनांक: 15.03.2026 रोजी धायरी पुणे येथे संपन्न झाला.

**उद्देश:** ज्या महिलांनी आपले स्वप्न बाजूला ठेवून आपल्या पाल्यासाठी अपार कष्ट करून त्यांना चांगले शिक्षण, संस्कार चांगल्या सवयी लावून त्यांना एक चांगला नागरिक बनवल्या अशा आईंचा सन्मान करून प्रोत्साहन देणे.

**स्वरूप: सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व तुळशीचे रोप देऊन त्यांच्या कार्याचे प्रगट करून पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.**

***<u>कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी:</u>***

**1. सौ. अनिता काकासाहेब चव्हाण - संचालिका धारेश्वर विद्या वक्र प्रतिष्ठान**

**2. सौ. स्वाती सचिन पोकळे - संस्थापिका अनुसया फाउंडेशन**

**3. सौ ज्योती निलेश पाटील - आरटीओ इन्स्पेक्टर**

**4. सौ कविता सुनील भोसले - सामाजिक कार्यकर्त्या**

**5. सौ आशा इंद्रसेन गोरे - डायरेक्टर सुप्तबीज फाउंडेशन**

# सन्मानित केलेल्या कर्तुत्ववान माता

| सन्मानित माता नाव | सन्मान करण्याचे कारण |
|---|---|
| सौ. शकुंतला रामेश्वर पैठणे | पहाटे चार वाजल्यापासून पोळ्या करण्याच्या कंपनीमध्ये काम करून आपल्या मुलींना शिकवून त्यांच्या पायावर उभा केले. |
| सौ. सारिका नीलकंठ एडके | स्वतःचा मुलगा आनंद आहे. त्याच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमी प्रयत्न करत आहेत. |
| सौ. अश्विनी गणेश आमटे | स्वतःची दोन्ही मुलं कर्णबधीर व मूकबधिर दोन्ही मुलांसाठी अतोनात कष्ट करून त्यांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी सतत धडपड |
| सौ. रुक्मिणी विलास खाडे | आपल्या मुलाबरोबर आपल्या कुटुंबातील इतरही मुलं शिकली पाहिजे यासाठी आपल्या मुलाबरोबर उत्तर मुलांनाही शिक्षण देऊन त्यांच्या पायावर उभा केले. |
| सौ.ललिता लक्ष्मण पवार | दररोज सकाळी सोसायटीमधील कचरा गोळा करून. स्वतःच्या मुलाला शिक्षित करून स्वयंपूर्ण केले. |
| सौ. अनिता योगेश हानमघर | मुलाप्रमाणे शिकल्या पाहिजे यासाठी स्वयंपाक करण्याचे काम करून आपल्या मुलींना शिक्षण देऊन त्यांना घडवण्याची काम करत आहेत. |
| अश्विनी ठाकूर | अचानक पतीचे निधन झाल्यानंतर दोन मुलींची जबाबदारी. सामाजिक संस्थेत काम करून मुलींचा संभाळ व महिलांसाठी काम. |
| सुनिता लायगुडे | सामाजिक काम करताना आपल्या मुलीला सतत संस्कार व शिक्षणाची विशेष जबाबदारी. |
| सौ. अनिता अश्विक सावंत | मिस्टर सैनिक सेवेमध्ये. घराची संपूर्ण जपातळी त्यांच्याकडे. मुलांकडे लक्ष देऊन मुलांना स्वतःच्या पायावर उभा केले. |
| सौ. नीलम राकेश मोरे | मुलगी शंभर टक्के अपंग सर्व गोष्टी जाग्यावरच करायच्या दिल तेरा वर्षापासून तिचे संगोपन व्यक्तिगत जीवनाचा त्याग करून |

Suptbeej Foundation




